# तुझी याद



तुझी याद यावी
अशा रम्य वाटा
सखे तुझ्या गावी
रवी येईल आता

किती हा फुलोरा
इथे सांडलेला
सुगंध वाऱ्यावरी
स्वार झाला

केतकीलाही बघ
तुझा गंध आला
मोगरा असे कि
तुझी दंतमाला?

उसासे भरुनी
आकाश आले
जसे भासती ते
तुझे नेत्र ओले

तुझ्या आठवाने
मन दाटलेले
सांगेल गुज हे
किरण बघ आले

**- नरेंद्र प्रभू**
http://prabhunarendra.blogspot.com/
http://shabdshabd.blogspot.com/